पारावरच्या गप्पा

# कांदा खरंच जीवनावश्यक वस्तू आहे काय?



**नि**त्यनियमाप्रमाणे गणपत देवदर्शन घेऊन पारावर संपतची वाट पाहत बसला होता. आज संपतला थोडा वेळच झाला होता. गणपत निघायच्या तयारीतच होता, परंतु संपत येताना दिसला म्हणून तो थांबून राहिला.

संपत म्हणाला, ‘‘थांब रे गंपा. आलोच दर्शन घेऊन. उशीरच झाला मला.’’

गणपतनेही हसून- मान डोलावत संपतला प्रतिसाद दिला. देवदर्शन आटोपून गणपतच्या खांद्यावर हात ठेवत संपतने गणपतजवळ मांडी ठोकली.

‘‘का रं संपा, आज फारच उशीर केला यायला? धावपळ सुरू होती की काय?’’

यावर संपत हसून म्हणाला, ‘‘काही नाही रे, कांद्याच्या गोण्या घेऊन जायला टेम्पो आला होता. त्याला थोडा उशीरच झाला होता म्हणून सर्वांनी आपापल्या गोण्या भरून पाठविला कांदा मार्केटला. म्हणूनच उशीर झाला.’’

यावर गणपत म्हणाला, ‘‘कारं संपा, काय भाव मिळतोय कांद्याला? कारण मागच्या महिन्यात कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के कर लावल्याचं ऐकलं होतं. त्यामुळे अनेक ठिकाणी मोर्चे- मार्केट बंद अशा बातम्याही बघितल्या होत्या.’’

यावर संपत म्हणाला, ‘‘काही नाही रं, परत कांद्यानं वांधा केला. चांगले भाव वाढायला लागले होते. मात्र मागील एक वर्षापासून कांद्याला चांगला भाव मिळालाच नाही. उत्पादन खर्चही सुटत नव्हता. आता कुठे कांदा उत्पादकांच्या हातात दोन पैसे मिळतील अशी परिस्थिती निर्माण झाली तर तेवढ्यात सरकारने मध्येच खो घातला. एक तर निर्यातीवर ४० टक्के कर लावला. म्हणजे एका अर्थी निर्यातीवर बंदीच घातली म्हण की, त्यामुळे बाहेर जाणारा कांदा थांबला. कांद्याचे भाव २० ते ३० रुपयांपर्यंत वाढले होते. ते आता १५ ते २० रुपयांपर्यंत खाली आले. एक तर सध्या कांदा खराब होऊन राहिलाय. राहिलेल्या कांद्यामध्येही २०-३० टक्के खराब कांदा निघतो आणि त्यात असे भाव म्हणजे कांदा उत्पादकांना परत संकटाच्या खाईत लोटायचं काम केलं.’’

खरं तर गणपतने कधीच कांद्याची लागवड केली नव्हती आणि त्याला कांद्याला किती खर्च येतो याचीही माहिती नव्हती. म्हणून तो म्हणाला, ‘‘ठीक आहे ना रे संपा, १५ ते २० रुपये भाव म्हणजे चांगलाच आहे की नाही?’’

यावर संपत हसून म्हणाला, ‘‘खरं आहे गंपा तुझं. कारण तुला माहीत नाही की कांद्याला कसा आणि किती खर्च येतो ते. अरं गंपा, कांदा लागवडीपासून ते विक्री करेपर्यंत एकरी लाख- सव्वा लाख रुपये खर्च येतो. एकरी १० टन उत्पादन मिळाले तर सर्व सड- घाण आणि वजनामधील घट यांचा विचार करता फक्त ७ ते ७.५ टन कांद्याची विक्री होते. म्हणजे एक किलो कांदा तयार करायला १४ ते १५ रुपये खर्च येतो. बरं विक्री करताना सर्व कांद्याला सारखाच भाव मिळत नाही. कांद्याचे एक- दोन- तीन असे प्रकार पडतात तसेच गोल्टीही निघते. म्हणजे ज्यावेळी बाजारभाव २० रुपये किलोपर्यंत जातो त्यावेळी शेतकऱ्यांना सरासरी १२ ते १५ रुपये भाव मिळतो. मग आता तूच विचार कर गंपा, कांद्याचे भाव २० रुपये किलो म्हणजे सरासरी १२ ते १५ रुपये किलो आणि उत्पादन खर्च येतो १४ ते १५ रुपये किलो- म्हणजे तोटाच होतो की नाही कांदा उत्पादकांचा? ज्यावेळी शेतकऱ्यांना सरासरी २० रुपये किलोच्या पुढे भाव मिळेल, म्हणजे मार्केटमध्ये भाव ३० रुपयांच्या पुढे जाईल त्याचवेळी कांदा उत्पादकांना १० ते २० टक्के नफा होईल. परंतु हे

गणित कोणी समजूनच घेत नाही. सर्वांना वाटते की कांद्याचे भाव २० रुपयांच्या पुढे गेले की कांदा उत्पादकांना लॉटरी लागली! ज्याचं दुख: त्यालाच माहीत असतं! मागील दोन-तीन वर्षांपासून कांदा पिकाचा उत्पादन खर्च भरमसाठ वाढला आणि भाव मात्र तेथेच स्थिरावले. मीही विचार करतोय की पुढील वर्षांपासून कांदा उत्पादन घ्यावे की नाही!''

गणपतने संपतकडे बारकाईने बघितले. कारण अनेकदा गणपत चिंचेत असतो आणि त्याला संपत आधार देतो. आज गणपतला चिंता नाही, कारण तो कांदा उत्पादक नाही आणि संपत कांदा उत्पादक असल्यामुळे चिंतेत आहे. परंतु त्याला आधार देण्यासाठी गणपतकडे उत्तर नाही.

''कारं संपा, हे मला काही कळत नाही तुझं-तुझ्यासारखा उत्तम शेतकरी सतत नव्याचा ध्यास घेतो, अडीअडचणींवर मात करून शेतीत प्रगती करतो; मग आता कसं काय म्हणतो की कांदा लावायचा की नाही याचा विचार करतोय? तुझ्यासारख्या शेतकऱ्यांनी कांदा लावला नाही तर मग माझ्यासारखे शेतकरी थोडेच कांदा करतील? शासनाला या बाबी नाही कळत कारं संपा? मला तर एक गोष्ट समजतच नाही. एकीकडे सरकार म्हणतंय शेतीमाल निर्यात करा. दुसरीकडे शेतीमालाच्या निर्यातीवर बंधन आणते किंवा मोठ्या प्रमाणात टॅक्स लावते. नेमकं सरकारचं डोकं ठिकाणावर आहे की नाही हेच मला कळत नाही.''

यावर संपत हसत म्हणाला, ''गंपा, सरकारचं डोकं चांगलंच ठिकाणावर आहे. सरकारला शेती उत्पादकांपेक्षा शेतीमाल खाणाऱ्यांची म्हणजेच ग्राहकांची जास्त काळजी आहे. अर्थात आताचेच सरकार नाही तर आधीच्या सर्व सरकारांना ग्राहक राजा महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांचा बळी देऊन ग्राहक राजाला खूष ठेवण्याचा सतत प्रयत्न असतो. आता तर इलेक्शन पुढे आल्यामुळे सरकार ग्राहकांचीच काळजी घेते. १०-१५ वर्षांपूर्वी दिल्लीचे सरकार कांद्यामुळे पडले होते. तेव्हापासून तर सगळ्याच पक्षांच्या डोळ्यात कांद्याने पाणी आणले आहे. म्हणून कांदा हा विषय सर्व राजकारण्यांचा व राजकीय पक्षांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. कांद्याचे भाव वाढले तर गृहिणी टीव्ही चॅनलवर प्रतिक्रिया देताना म्हणतात की- आमच्या कुटुंबाचे बजेटच एकदम कोलमडून गेलं! असं कसं? महिन्याला चार-पाच किलो कांदे १०-२० रुपये जास्त मोजून विकत घेतले म्हणजे या वाढीव ५०-६० रुपयांनी कुटुंबाचे अर्थकारण पार बिघडून जाते? आहे की नाही हसण्यासारखी गोष्ट? खरं तर कांदा ही जीवनावश्यक वस्तू आहे हीच संकल्पना चुकीची आहे. कांदा महाग झाला आणि ज्याला परवडत नाही त्यांनी कांदा खाल्ला नाही तर त्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे- किंवा सोप्या भाषेत कोणी मरणार आहे असे नाही ना? मग या विषयावर फार चर्चा करून एक तर त्या उत्पादनाचे भाव पाडले जातात, निर्यातीतून डॉलरच्या स्वरुपात देशाला पैसे मिळतात ते दारही बंद केले जाते. उत्पादन होताच शेतकरी त्या पिकापासून दूर जातो आणि परत त्या पिकाची कमतरता जाणवते. मग आपण आयातीची भाषा बोलतो. खरं तर हे दुष्टचक्र थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी खरंच कोणती गोष्ट जीवनावश्यक आहे आणि कोणती नाही यामध्ये स्पष्टता पाहिजे. दुसरी बाब म्हणजे जीवनावश्यक वस्तू आहे तर त्याचा भार उत्पादकांवर का टाकावा? जीवनावश्यक वस्तू ग्राहकांना उपलब्ध करून देणे हे सरकारचे काम आहे- उत्पादकांनी जास्त खर्च करून उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात म्हणजेच तोटा सहन करून त्या वस्तू का विकाव्यात? असे अनेक प्रश्न आहेत गंपा. हे सर्व सरकारला कळत नाही असे नाही. परंतु त्याच्या मते प्रत्येक वस्तूच्या- येथे कृषिमालाच्या उत्पादकांचे प्रमाण कमी आणि ग्राहकांचे जास्त आहे. त्यामुळे साहजिकच ज्यांची संख्या जास्त असते, म्हणजेच 'मेजॉरिटी' असते त्यांच्याच बाजूने निकाल लागतो. म्हणूनच कांदा असो की शेतीची इतर उत्पादने- ग्राहकांच्या हिताचा विचार करून त्यांचा भाव जास्त वाढू द्यायचा नाही हे सुरू आहे! पण तुला सांगतो गंपा, हे फार दिवस चालणार नाही. कारण उत्पादकच राहिला नाही तर खाणार काय? तेल, डाळी, साखर, कांदा, गहू, तांदूळ यांचे बाजारभाव वाढले की निर्यात बंद करून बाजारभाव नियंत्रणात ठेवले गेले असे वाटते. परंतु उत्पादकांचे झालेले नुकसान यातून भरून येणार नाही. यामुळे शेतकरी यातून खचत गेला तर किती दिवस तो टिकाव धरेल? शेवटी परत सरकारला त्याचे हित बघावेच लागेल; कारण तो टिकला तरच शेती टिकेल आणि त्यातून सर्व समाजाला दोन वेळचे खायला मिळेल. असं झालं तरच देश शाश्वत स्वरुपात अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी राहील. हे सुखावह चित्र दिसण्यासाठी नक्कीच मन शांत ठेवून पोट भरण्यासाठी काहीतरी काम करायला लागणार आहे गंपा, निघू आता शेताकडे.''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**